दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार दि.१३ डिसेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १११ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Saturday 13 December 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 111 • Pages 4 • Rate 4 Rs

# मराठवाड्यातील ७० हजार कुटुंबांना हक्काचे घर

## 'मदत माश' जमिनी होणार मोफत नियमित; हैदराबाद इनामे व रोखे अनुदाने रद्द सुधारणा विधेयक मंजूर



**छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील आणि चंद्रपूरच्या राजुरा भागातील सुमारे ७० हजार कुटुंबांना आज मोठा दिलासा मिळाला आहे. मराठवाड्यातील हजारो कुटुंबाच्या डोक्यावर टांगती तलवार असलेल्या 'मदत माश' इनामी जमिनींचा प्रश्न अखेर निकाली निघाला. या जमिनींवरील निवासी घरे नियमित करण्यासाठी आता कोणताही नजराणा भरावा लागणार नाही. ती घरे मोफत नियमित करून रहिवाशांना जमिनीचे 'वर्ग-१' मालकी हक्क देणारे 'हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५' (विधेयक क्र. १०१) विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले.विधानसभेत मांडण्यात आलेल्या या विधेयकावर जयंत पाटील, अर्जून खोतकर, विजय वडेट्टीवार, देवराव भोंगळे, किशोर पाटील, बालाजी कल्याणकर, चंद्रदीप नरके, भास्कर जाधव, शेखर निकम, मनिषा चौधरी, सुरेश धस, कैलास पाटील यांनी चर्चेत सहभागी होत महत्वपूर्ण मुद्दे मांडले.**



### कोकण आणि मुंबईसाठीही आश्वासक निर्णय

**चर्चेत भाग घेताना भास्कर जाधव (शिवसेना-उबाठा) यांनी कोकणातील मच्छिमारांच्या जमिनींचा प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, मच्छिमार अनेक पिढ्यांपासून तिथे राहतात, पण जमीन त्यांच्या नावावर नाही. त्यांनाही हैदराबाद इनामाप्रमाणे न्याय द्यावा. तर आमदार मनीषा चौधरी यांनी मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणांच्या सीमांकनाचा मुद्दा मांडला.यावर उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी कोकणातील बांधकामांना गावठाणाचा दर्जा देण्यासाठी आणि मुंबई तील प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले.**

दैनिक वादळ वार्ता
**नागपूर । प्रतिनिधी**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधेयक मांडताना स्पष्ट केले की, १९५४ च्या कायद्यानुसार या जमिनी भोगवटादार वर्ग-२ (नवीन व अविभाज्य शर्ती) म्हणून गणल्या जात होत्या. त्यामुळे या जमिनींवर कर्ज मिळत नव्हते किंवा त्या हस्तांतरित करता येत नव्हत्या. यापूर्वी अशा जमिनी नियमित करण्यासाठी चालू बाजारभावाच्या ५० टक्के किंवा ५ टक्के रक्कम भरावी लागत होती, ज्यामुळे नागरिक पुढे येत नव्हते. मात्र, आता मंजूर झालेल्या विधेयकानुसार, जर एखाद्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय निवासी कारणासाठी जमिनीचा वापर केला असेल आणि त्याबाबतचे खरेदीखत किंवा नोंदणीकृत दस्तऐवज सादर केल्यास, कोणताही नजराणा न आकारता ती जमीन नियमित केली जाईल. तसेच, संबंधित जमीनधारकास 'भोगवटादार वर्ग-१' चा दर्जा मिळेल, ज्यामुळे त्यांना पूर्ण मालकी हक्क प्राप्त होतील.चर्चेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) गटनेते जयंत पाटील यांनी शंका उपस्थित केली. ते म्हणाले, हे विधेयक केवळ
काही मूठभर लोकांसाठी किंवा विकासकांसाठी आहे का? देवस्थानांच्या जमिनी लाटून त्या विकल्या गेल्या आहेत, त्यांना अभय देण्यासाठी हा घाट घातला जात आहे का? हे विधेयक देवस्थान जमिनींना लागू होणार नाही, हे स्पष्ट करावे.त्यावर उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी देवस्थानशी याचा काहीच संबंध नसल्याचे स्पष्ट केले. हे विधेयक केवळ 'मदत माश' इनामापुरते मर्यादित आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगरमधील ९७ गट, जालन्यातील १०, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर, धाराशीव आणि चंद्रपूरमधील राजुरा येथील १० गटांचा समावेश आहे.

# मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यस्तरीय बैठकीला बहुसंख्येने उपस्थित रहा-दिनकर शिंदे

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई ( प्रतिनिधी )**



अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या विस्तारित कार्यकारणीची बैठक, बीड जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकारांचा सन्मान आणि स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी देवडी येथे होणार आहे. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील सर्व डिजिटल मीडिया परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसह पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.

वडवणी तालुक्यातील देवडी येथील माणिक बागेत होत असलेल्या या कार्यक्रमास अ भा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, उपमुख्यमंत्र्यांचे आरोग्य कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, पत्रकार विशाल परदेशी, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे आदींसह पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. सकाळी ११ ते १ पर्यंत पुरस्कार वितरण सोहळा आणि दुपारी २ वाजता परिषदेची बैठक होणार आहे. या सोहळ्यास बीड जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व तालुक्यातील पदाधिकाऱ्यांसह पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.

# चिंचगव्हाणमध्ये जलजीवन मिशनचे बोगस काम उघड

## बीड जिल्हा प्रभारी ॲड.डोंगरे यांची चौकशीची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**



तालुक्यातील चिंचगव्हाण ग्रामपंचायतीत सुरू असलेल्या जलजीवन मिशनच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता व बोगस पद्धतीने काम केले जात असल्याचा गंभीर आरोप बहुजन समाज पार्टीचे बीड जिल्हा प्रभारी अड. अमोल विलासराव डोंगरे यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी गटविकास अधिकारी, गटविकास कार्यालय माजलगाव यांना लिखित निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली.अड. अमोल डोंगरे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, चिंचगव्हाण ग्रामपंचायतीत सुरू असलेले जलजीवन मिशनचे काम मंजूर अंदाजपत्रकानुसार न होता निकृष्ट दर्जाचे, बोगस आणि नियमबाह्य प्रकारे करण्यात येत आहे. या कामावर योग्य देखरेख नसल्याने सरकारी निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.त्यांनी पुढे म्हटले आहे की, हे काम तात्काळ स्थगित करून स्वतंत्र चौकशी नेमावी. झालेल्या बोगस कामाची तपासणी करून ते पुन्हा मंजूर निकषांनुसार करण्यात यावे. तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.अन्यथा गटविकास कार्यालयासमोर जाहीर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अड. अमोल डोंगरे यांनी दिला आहे.

# तहसीलदारांच्या बनावट सहीचा स्फोट

## तत्कालीन नायब तहसीलदारावर गुन्हा दाखल-महसूल विभाग हादरला

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



केज तहसील प्रशासनाला हादरवून सोडणाऱ्या धक्कादायक प्रकरणाचा पर्दाफाश झाला असून महसूल विभागात अक्षरशः खळबळ उडाली आहे. तहसीलदारांच्या बनावट सह्या करून अर्धन्यायिक प्रकरणाचा आदेश पारित केल्याप्रकरणी तत्कालीन नायब तहसीलदार आशा वाघ-गायकवाड यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरून केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी केज पोलिस ठाण्यात अधिकृत तक्रार नोंदवली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५५ नुसार अर्धन्यायिक अधिकार केवळ तहसीलदारांकडेच असतात. मात्र संबंधित प्रकरणात तत्कालीन नायब तहसीलदारांनी हे अधिकार स्वतःहून वापरून आदेश दिल्याचे गंभीर वास्तव तपासातून समोर आले आहे. त्याहूनही धक्कादायक बाब म्हणजे आदेशावर तहसीलदारांच्या नावाने बनावट स्वाक्षरी करून ती ग्राम महसूल कार्यालय आणि तलाठी कार्यालयास पाठवल्याचे स्पष्ट झाले.ही माहिती उघड होताच जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने सखोल चौकशीचे आदेश दिले. तपासात आदेशावरील सही पूर्णतः बनावट असल्याची पुष्टी झाली असून संपूर्ण प्रक्रिया बेकायदेशीर व नियमबाह्य असल्याचे निष्पन्न झाले आहे. या बनावट आदेशामुळे शेतकऱ्यांची दिशाभूल झाली तर महसूल अधिकारी आणि तलाठी यांच्या नियमित कामकाजावरही परिणाम झाल्याचे समोर आले.सदर घटनेत फसवणूक, सरकारी कागदपत्रांची बनावट निर्मिती, पदाचा गैरवापर यांसह अनेक गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवला जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. केज तालुक्यासह छत्रपती संभाजीनगर महसूल विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयातही या प्रकरणाने मोठी खळबळ उडाली आहे.या प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यामुळे महसूल विभागातील अधिकार्यांच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून दस्तऐवज पडताळणीची प्रक्रिया अधिक कडक करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. स्थानिक पातळीवर या प्रकरणाची जोरदार चर्चा असून संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाईची जनतेतून मागणी होत आहे.



# सोनाई अँग्रो कारखान्याचा २७५० रु भाव जाहीर!

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**



परळी तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी सोनाई ॲग्रो कारखान्याने दिली असून चालू गाळप हंगामासाठी(२०२५-२६) उसाचा दर जाहीर केला असून यावर्षी शेतकऱ्यांना प्रती टन २७५० रुपये इतका भाव मिळणार आहे. कारखान्याच्या संचालक मंडळाने घेतलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती सोनाई अँग्रोचे चेअरमन श्री.प्रा. टी.पी.मुंडे सर आणि उपाध्यक्ष श्री. आत्मारामजी कराड तसेच कारखान्याच्या संचालक मंडळाकडून देण्यात आली आहे.परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना पहिला उसाचा हप्ता २७०० रुपये मिळणार असून दुसरा हप्ता ५० रुपयांचा मिळणार आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त आपला ऊस कारखान्यास द्यावा असे आवाहन सोनाई अँग्रो कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त केज येथील शिक्षक कॉलनीत चौकाची स्थापना

दैनिक वादळ वार्ता
**प्रकाश मुंडे । बीड**



दिनांक १२ डिसेंबर २०२५, शुक्रवार रोजी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त केज येथील शिक्षक कॉलनी , बीड रोड केज मध्ये विशेष उत्साहाचे वातावरण होते. लोकनेते मुंडे साहेब यांच्या कार्याचे स्मरण करून हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आणि याच निमित्ताने शिक्षक कॉलनीत बीड रोडला त्यांच्या नावाने एका चौकाची स्थापन करण्यात आली.यावेळी 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब चौक' शिक्षक कॉलनी केज असे नामकरण करून त्याचे लोकार्पण करण्यात आले.या महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी स्थानिक युवकांनी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. पत्रकार प्रकाश मुंडे, चंदू चौरे, अमोल ठोंबरे, गोटू भैय्या पाळवदे, अमोल मुंडे, योगेश हांगे, सोनू वैभव धस, अमोल धस, रोहित मुंडे, अमोल घुले, गणेश ढाकणे, प्रविण थोरात आणि राजा राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा कार्यक्रम अतिशय यशस्वी आणि प्रेरणादायी ठरला.शिक्षक कॉलनीतील या चौकामुळे स्वर्गीय मुंडे साहेब यांच्या स्मृतीला कायम उजाळा मिळेल, अशी भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

संपादकीय

# बदलत्या धोरणाने साखरपट्टा हैराण

दक्षिण महाराष्ट्राचा साखरपट्टा काळानुसार उद्योग–विकासाचा ठेवा असला तरी, आताची आर्थिक परिस्थिती चिंताजनक आहे. कारखान्यांनी इथेनॉल क्षमतेकडे वळण्यास मोठी गुंतवणूक केली. डिस्टिलरी व बायोइंधन युनिट उभारण्यावर हजारो कोटींची रक्कम कर्ज उभे करून गुंतवली आहे. ते सगळेच सध्या अडचणीत आहेत. उपायांवर तातडीने कृती न झाल्यास दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखानदारांची आर्थिक स्थिती आणखी बिकट होईल.सरकारने इथेनॉल ब्लेंडिंग वाढवण्यावर भर दिल्याने गेल्या काही वर्षांत तेल कंपन्यांकडून इथेनॉलची खरेदी मोठ्या प्रमाणावर वाढवली गेली; परंतु मागील काही तिमाहींत खरेदीच्या पद्धतीत व प्रमाणात अनियमितता आणि अपेक्षित गती मिळाली नाही. सरकारी आकडेवारीनुसार इएसवाय अर्थात इथेनॉल सप्लाय इयर २०२३–२४ मध्ये एकूण ७०७ कोटी लिटर इतका इथेनॉल खरेदी/ब्लेंडिंग नोंदला गेला; परंतु २०२४–२५च्या सुरुवातीस मिळणाऱ्या आकडेवारीनुसार ब्लेंडिंगदर महिन्याअखेर बदलत राहिला; जुलै २०२५ मध्ये सरासरी ब्लेंडिंग सुमारे १९% वर नोंदले गेले. म्हणजे मागणीत काही प्रमाणात वाढ झाली असली तरी ती सर्वच कारखान्यांसाठी स्थिर करण्यात आलेली नाही. कारखान्यांनी इथेनॉल क्षमतेकडे वळण्यास मोठी गुंतवणूक केली. डिस्टिलरी व बायोइंधन युनिट उभारण्यावर हजारो कोटींची रक्कम कर्ज काढून गुंतवली आहे. माध्यमांमधील अहवालांनुसार साखर कारखाने आणि इतर उद्योगांनी इथेनॉल क्षमतेसाठी अंदाजे ४० हजार कोटींपर्यंत गुंतवणूक केली आहे; परंतु तेल कंपन्यांकडून खरेदीचे ठरावीक टेंडर व दीर्घकालीन खरेदी पर्याय न मिळाल्याने या गुंतवणुकीचा लाभ अपेक्षेनुसार प्राप्त होत नाही. अशा गुंतवणुकीवर घेतलेले कर्जही मोठे आहे आणि ते परतफेडीसाठी उद्योगाला दडपण वाढेल अशी चिंता आहे. हे दडपण शेवटी कारखान्यांची चाके रुतण्यापर्यंत वाढू शकते. सरकारकडून साखर निर्यातीवरील निर्बंध आणि धोरणात्मक निर्णयही उद्योगावर प्रभाव टाकतात. २०२३–२४ सीझनपासून भारताने मोठ्या प्रमाणावर निर्यातीवर मर्यादा आणल्या. २०२४ मध्ये निर्यातबंदी/मर्यादेचे निर्णय पडताळले गेले. पण या काळात पुरवठा साखळी बाधित झाल्यामुळे जागतिक बाजारात भारताचा पुरवठा कमी झाला आणि दरांची अनिश्चितता निर्माण झाली. एका अहवालानुसार सरकारने कधीकधी निर्यात मर्यादा आणि इथेनॉल प्रोत्साहनामुळे स्थानिक पुरवठा आणि इथेनॉलला प्राथमिकता दिली आहे; परंतु वास्तविक बाजारात त्यामुळे तत्काळ आर्थिक मदत कशी होईल हा प्रश्न अनुत्तरीत राहतो.जागतिक साखर बाजारपेठेतील दरांमध्ये चढ–उतार अतिशय तीव्र आहेत. आंतरराष्ट्रीय फ्युचर्स आणि ट्रेडिंग डेटा दाखवतो की कधीकधी डॉलर/पाउंडच्या दरांमध्ये महिन्यांत ५–१०% चढ–उतार सामान्य झालेला आहे; किंबहुना २०२४–२५च्या काळात ब्राझीलच्या उत्पादनातील घट आणि भारतीय निर्यातीच्या मर्यादेमुळे जागतिक दरांवर दबाव पडला. ट्रेडिंग इकॉनॉमिक्सच्या स्रोतांनुसार जागतिक मागणी–पुरवठा संतुलन अनिश्चित असल्याने भारतीय कारखान्यांसाठी निर्यातातून अपेक्षित निराकरण वेळोवेळी बदलते. त्यामुळे स्थानिक विक्रीमुळे मिळणारी कमाईदेखील अस्थिर बनली आहे. दक्षिण महाराष्ट्रातील कारखान्यांची स्वतःची आर्थिक आकडेवारीही स्पष्टच धोकादायक आहे. काही उद्योग अहवालांनुसार साखर उत्पादन अंदाज आणि ईथेनॉल व्हेरियबल्स विचारात घ्यावेत, तर २०२५ मध्ये देशस्तरीय शिल्लक व उत्पादन हा स्पष्ट अंदाजाबाहेर असून अनेक कारखान्यांवर कार्यकारी भांडवल आणि बँक कर्जांचे ताण वाढले आहे. भारतीय साखर कारखानदार संघटनेच्या ताज्या अंदाजानुसार नेट साखर उत्पादन व इथेनॉलकडे डायव्हर्जन या दोन्ही गोष्टींमुळे कारखाने वेगवेगळ्या परिणामांना सामोरे जात आहेत. अर्थात, महाराष्ट्र हे राज्य इथेनॉल क्षमतेमध्ये अग्रक्रमावर असले तरीही स्थानिक कारखान्यांना कर्ज परतफेडीसाठी तरलता मिळणे हे मोठे आव्हान ठरले आहे. स्थानिक पातळीवरील परिणाम गंभीर आहेत. ऊस खरेदीचे दर वाढत असताना साखरेचा विक्री दर स्थिर किंवा काही भागांत घटत असल्याने (काही ठिकाणी प्रति क्विंटल दरांमध्ये घट नोंदली गेली) कारखान्यांचा मॅर्जिन तुरळक झाला आहे. एफआरपीची कायदेशीर बांधिलकी असताना पैसे देण्यासाठी बँक कर्जावाचून कारखाने अडचणीत येतात. परिणामी शेतकऱ्यांना एफआरपी उशिरा मिळणे, थकबाकी वाढणे आणि पुढील हंगामासाठी तणाव सुरू झाले आहेत.या आर्थिक असमतोलामुळे काही लहान कारखाने तात्पुरते क्रशिंग थांबवण्याचा विचार करत आहेत, तर इतरांनी कर्ज स्त्रोत शोधण्यास सुरुवात केली आहे. आता यासाठी लागणारी मदत आणि कर्ज देणार कोण? उपाय म्हणून साखर उद्योगाने तीन महत्त्वाचे मुद्दे नेहमीच मांडले आहेत. (१) केंद्राने इथेनॉलच्या खरेदीसाठी दीर्घकालीन, स्थिर आणि पारदर्शक टेंडर व किंमत धोरण आखावे (२) साखरेसाठी किमान आधारभाव किंवा समर्थन धोरण लागू करावे आणि (३) बँकांना कारखान्यांच्या तात्पुरत्या तरलतेसाठी सुलभ कर्ज/रीफायनान्सिंगची व्यवस्था द्यावी. या उपायांवर तातडीने कृती न झाल्यास दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखानदारांची आर्थिक स्थिती आणखी बिकट होईल आणि त्याचा परिणाम शेतकरी, मजूर व संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दिसेल. आकडेवारी सांगते, की, इथेनॉल ब्लेंडिंगची धोरणात्मक दिशा असूनही प्रत्यक्षात गुंतवणूक केलेल्या ४० हजार कोटींच्या कर्ज, व्याज प्रमाणात अपेक्षित परतावा देण्यास मार्ग न मिळणे, जागतिक बाजारातील अनिश्चितता व स्थानिक तरलतेचा तुटवडा हे सर्व एकत्र येऊन दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखानदारांना गंभीर आर्थिक तणावात आणत आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी धोरणात्मक स्पष्टता, बाजारात प्रवेश व आर्थिक सुलभता आवश्यक आहे.

# अन्यथा सरकारने आम्हांला फाशी दयावी वा गोळ्या घालाव्यात–पिडितांची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई | प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील महापालिकांना पादचाऱ्यांची सुरक्षा अंतर्गत नियमावलीचे निर्देश दिले आहेत. राज्य शासनाच्या निर्देशानुसार, मुंबई महानगरपालिकेने संपूर्ण मुंबईत रस्त्याशेजारी आणि उघड्यावर राहणाऱ्या श्रमिक बेघर नागरिकांचे मोठ्या प्रमाणात निष्कासन कारवाई चालू केली आहे. त्याचबरोबर मुंबई पोलिसांनी सुद्धा रस्त्यावर राहणाऱ्या श्रमिकांना मुंबई भिक्षेकरी प्रतिबंध कायद्याअंतर्गत अटक करून भिकारी बनवले आहे.

दि. २ डिसें.२५ रोजी चिकूवाडी बोरिवली पश्चिम येथील मुंबई महापालिकेच्या नालेसफाईची कामे करून आत्मसन्मानाने जगणाऱ्या ५५ पारधी समाजातील कुटुंबांच्या झोपड्यांवर अतिशय निर्दयतेने कारवाई करीत थंडीच्या दिवसांमध्ये या पारध्यांना बेघर केले. एकीकडे महाराष्ट्र शासन, शासन निर्णयान्वये थंडीच्या दिवसात रस्त्यावर राहणाऱ्या बेघरांची काळजी घेण्याबाबत महापालिकेंना निर्देश देते. मात्र दुसरीकडे मुंबई महापालिका या शासन निर्णयाविरोधात जाऊन थंडीच्या दिवसात उघड्यावर, रस्त्याच्या शेजारी आणि नाल्या शेजारी राहणाऱ्या भटके विमुक्त समाजातील पारधी कुटुंबियांच्या झोपड्यांची तोडमोड करीत आहे.

. मुंबई महापालिका आर सेंट्रल विभागाच्या तोडक कारवाईमुळे बोरिवली चिकूवाडी नाल्याच्या शेजारी राहणाऱ्या पारधी समुदायातील २५ शाळेत जाणाऱ्या मुलांचे सुद्धा नुकसान झाले आहे. ते शाळेत जाऊ शकत नाहीत. या तोडक कारवाईमुळे हे भयभीत झालेला पारधी श्रमिक रोजगाराला सुद्धा जाऊ शकत नाही आणि थंडीच्या दिवसात आसऱ्यासाठी आपली मुलं – वयस्कर आई बापांसोबत वणवण भटकत आहे. यात तोडक कारवाईमुळे कॅन्सर पीडित जेष्ठ नागरिक, ७ दिवसाची, १ महिन्याची आजारी मुलं आणि अनेक वयस्कर नागरिकांची दैना झाली आहे.




चिकूवाडीतील पारधी श्रमिक मुंबईतील नालेसफाई चे काम, रस्ता सफाई, अगदी गणेशोत्सवाच्या काळात कृत्रिम तलाव बनवण्याचे काम करून महापालिकेला एक प्रकारचे सहकार्य देत आलेले आहेत.

त्याबरोबर, दत्तानी पार्क बस स्टॉप शेजारी,कांदिवली पूर्व या ठिकाणी मागील १५ वर्षापासून वास्तव्यास असलेल्या पारधी कुटुंबांना गेल्या वर्षभरापासून येथील महापालिका आणि पोलीस अधिकारी बसू देत नाही, त्यांचे जेवणाचे, चुलीचे सामान लाथेने फेकले जाते. बोरीवली येथील डॉन बॉस्को शाळेसमोरील तसेच बोरिवली एमटीएनएल ऑफिस समोरील श्रमिक बेघरांना, तसेच विलेपार्ले स्टेशन जवळील राहणाऱ्या श्रमिकांना अटक करण्याचे धमकावून भयभीत केले जात आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पादचारी सुरक्षेसाठी मुंबई पोलीसानी दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी दत्तानी पार्क कांदिवली हायवे शेजारी राहणाऱ्या पाच श्रमिक पारध्यांना रोजगाराचे आमिष दाखवत पोलिस स्थानकात घेऊन गेले आणि मुंबई भिक्षेकरी कायद्याअंतर्गत भिकारी म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. त्यांना अटक करून न्यायालयात नेल्यावर तिथे त्यांना प्रत्येकी २१०० रुपयांचा दंड आकारून गुन्हेगार – भिकारी म्हणून त्यांची नोंद करण्यात आली आणि या प्रमाणिक श्रमिकांच्या आत्मसन्मानाला ठोकर मारली आहे.

. मुंबई महापालिकेच्या तोडक कारवाई आणि पोलिसांच्या अमानवी छळाच्या दहशतीतील पीडित गीता काळे यांनी आम्ही या देशाचे नागरिक नाही का? पारधी म्हणून आम्हाला काय जगण्याचा अधिकार देणार आहात की नाही? आम्हाला गोळ्या घाला नाही तर लटकावा असे उदवेगपणे सांगितले.

विलेपार्ले येथील सुनिता यांनी सांगितले की कुत्र्या मांजराचे जगण्यापेक्षा सरकारने आम्हाला गोळ्या घालून ठार मारावेत.आम्ही भीक मागत नाही तर आम्ही श्रम करतोय, आम्हाला आमचे अधिकार पाहिजेत. आम्हाला सोई सुविधा आणि घराचा अधिकार सुद्धा पाहिजे. घराचे पैसे द्यायला लागले तरी पण आम्ही मेहनत करून द्यायला तयार आहोत.

बोरिवली एमटीएनएल ऑफिस समोर राहणाऱ्या आशा दुबे यांनी सांगितले की,नववी दहावीत माझी शिकणारे मुलं आज पोलिसांच्या आणि बीएमसीच्या भीतीमुळे शाळेत जात नाहीत.माझी पुरी जिंदगी रस्त्यावरती गेली पण मला माझ्या मुलांची जिंदगी रस्त्यावर घालवायची नाही तर त्यांना शिक्षण द्यायचं आहे. सरकारने शिक्षणाचा अधिकार तरी नाकारू नये अशी विनंती केली. मुंबई भिक्षेकरी कायद्यान्वये अटक केलेल्या दिलीप काळे याने सांगितले की पोलीस स्टेशन मध्ये काम असे सांगून नेले मात्र आम्हाला अटक करून भिकारी बनवले.रोजगार तर मिळाला नाही उलट २१०० रुपयांचा दंड सुद्धा भरून भिकारी म्हणून भिक्षेकरी गृहात एक दिवस राहावं लागल्याची खंत बोलून दाखवले.

मानव अधिकार चवळीतील कार्यकर्ते एडवोकेट रहिमत यांनी त्यांचा अनुभव सांगताना सांगितले की भिक्षे करू कायद्याचा बळी हा नेहमीच पारधी समाजातील लोकांचा होत आला आहे पारधी समुदायासाठी रेणके आयोग इदा त्या आयोगाने सुचवलेल्या शिफारशी जर शासनाने लागू केल्या तर रस्त्यावरती एकही पारधी दिसू शकणार नाही असे सांगितल.

पाणी हक्क समितीचे समन्वयक जगदीश पाटणकर यांनी सरकार एका बाजूला रस्त्यावरच्या उघड्या उघड्यावर रस्त्यावरील लोकांच्या थंडीपासून संरक्षणासाठी जीआर काढते तीच मुंबई महानगरपालिका थंडीच्या दिवसात श्रमिकांना वाऱ्यावर सोडते. हा शासनाचा भटके विमुक्तसोबत दुजाभाव असल्याचे सांगतात.

आजच्या पत्रकार परिषदेमध्ये मुंबईतील पारधी समुदायावर होत असलेल्या अत्याचारा संदर्भात माध्यमासमोर येऊन लोकांनी आपल्या व्यथा मांडल्या त्याचबरोबर खालील मागण्या सुद्धा मांडण्यात आल्या –

१.थंडीच्या दिवसात महापालिकेद्वारे होणारे तोडमोड कारवाई त्वरित थांबवण्यात यावी.
२.मुंबई पोलिसांद्वारा भिक्षेकरी कायद्यांतर्गत रस्त्यावरील श्रमिकांची होत असलेली अटक ताबडतोब थांबविण्यात यावी.
३.या अत्याचारी कारवाईत सामील सर्व मुंबई पोलिस आणि मुंबई मनपा अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.
४.माननीय प्रधानमंत्री यांच्या स्वप्नातील योजने नुसार बेघरांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ३ किलोमीटरच्या परिघात या सर्व कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात यावे.
५.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, श्रमिक बेघरांसाठी कौटुंबिक निवारा अथवा प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आवासाची व्यवस्था होत नाही तोपर्यंत त्यांना त्याच ठिकाणी वास्तव्यास मुभा द्यावी आणि महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार मूलभूत सुविधा आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा.

# विशाल गणेश ट्रस्टमध्ये सभासदत्व नाकारले उप धर्मादाय अधिकार्यांकडे केली काहींनी तक्रार

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

नगरचे ग्रामदैवत विशाल गणेश मंदिर देवस्थान ट्रस्टमध्ये सभासदत्व दिले जात नसल्याची तक्रार पाचजणांनी केली असून, यासंदर्भात त्यांनी उप धर्मादाय आयुक्तांना पत्र पाठवून या प्रकाराची चौकशी करण्याची व सभासदत्व मिळवून देण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या तक्रार अर्जात या पाच जणांनी गंभीर दावा केला असून, त्यानुसार गेल्या १० ते १५ वर्षापासून ट्रस्ट संस्थेकडून माळी समाजातील व्यक्तींना कोणतेही सभासदत्वाचे अर्ज मुद्दाम व जाणुनबुजून मंजूर केलेले नाहीत अथवा त्यांना सभासदत्व दिले जात नाही, असे स्पष्ट केले आहे.

संजय माधव कानडे, (रा. कानडे मळा, सारस पुला जवळ, सारसनगर, नगर), बजरंग नामदेव भुतारे (रा. माळीवाडा, भोपळेगल्ली, नगर), प्रसाद विनायक कोके (रा. वसंत टॉकिज जवळ, इवळे गल्ली, माळीवाडा, नगर), जालिंदर नारायण खंदारे (रा. घर नं. ५५२१, माळीवाडा, पारगल्ली, नगर) व दीपक दत्तात्रय एकाडे (रा. टिळक रोड, हॉटेल राज पॅलेसजवळ, नगर) यांनी उप धर्मादाय आयुक्तांकडे सभासदत्त्व अर्जाबाबत तक्रार दाखल केली आहे. यात त्यांनी म्हटले आहे की, शहर अहिल्यानगर महापालिका हद्दीमध्ये अर्जदार कायमचे रहिवासी असून धर्माने व जन्माने हिंदु धर्मीय आहेत व माळी समाजाचे आहेत. नगर शहरात माळी समाजाचे माळीवाडा पंच मंडळ देवस्थान व धर्मफंड ए–२४२/अ. नगर ही नोंदणीकृत ट्रस्ट संस्था असून ट्रस्ट संस्थेला नोंदणी करतेवेळी मान्यताप्राप्त नियम वा नियमावली नव्हती. परंतु तदनंतर मुंबई


श्री विशाल गणेश

येथील धर्मादाय आयुक्त यांच्याकडून ट्रस्ट संस्थेला मंजूर योजना दैनंदिन सुरळीत कारभाराकरिता मंजूर झालेली आहे. नमुद केलेली ट्रस्ट संस्था ही धार्मिक स्वरुपाची असून ट्रस्ट संस्थेच्या स्थावर मिळकती स्वमालकीच्या आहेत.अर्जदार यांनी ट्रस्ट संस्थेचे संबंधित अध्यक्ष/सेक्रेटरी यांच्या नावाने मंजूर योजनेप्रमाणे सभासदत्व मिळणेकामी लेखी अर्ज दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेला आहे. अर्जदारांचा सभासदत्व अर्ज ट्रस्ट संस्थेचे विश्वस्त नितीन पुंड यांनी समक्ष स्वीकारून पोहोच दिलेली आहे. अर्जदारांनी यापूर्वीही सभासदत्व मिळण्याकरीता लेखी अर्ज दिलेले होते. परंतु गेली १० ते १५ वर्षापासून ट्रस्ट संस्थेकडून माळी समाजातील व्यक्तींना कोणतेही सभासदत्वाचे अर्ज मुद्दाम व जाणुनबुजून मंजूर केलेले नाहीत अथवा सभासदत्व दिले जात नाही.अर्जदार यांच्या माहितीप्रमाणे सध्या ट्रस्ट संस्थेचे दैनंदिन कारभार पाहणार्या विश्वस्तांची मुदत संपत आलेली आहे व लवकरच नवीन विश्वस्तांच्या निवडीबाबत निवडणुका घेण्याच्या हालचाली सुरू आहेत. अर्जदार हेही ट्रस्ट संस्थेमध्ये हिरीरीने व उत्साहाने ट्रस्ट संस्थेच्या विकासाकरीता काम करण्यास तयार आहेत तसेच ट्रस्ट संस्थेच्या होणार्या निवडणुकीमध्ये सुद्धा भाग घेण्यास तयार आहेत. त्यमुळे या अर्जदारांनी ट्रस्ट संस्थेकडे सभासदत्व मिळणेकामी जे अर्ज दाखल केलेले आहेत, त्यावर त्वरीत कार्यवाही होण्याकरीता व अर्जदारांचे सभासदत्वाचे अर्ज मंजूर होण्यासाठी योग्य ती चौकशी करून पुढील कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी उप धर्मादाय आयुक्तांकडे केली असुन सभासदत्व मिळावे यासाठी सुमारे ३०० जण उत्सुक असुन फक्त प्रातिनिधिक स्वरुपात काही नावे देत असल्याचे प्रसाद कोके यांनी सांगितले.

# प्राथमिक निवासी आश्रम शाळा,टाकळी येथे लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब यांची जयंती साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**केज | प्रतिनिधी**

प्राथमिक निवासी आश्रम शाळा,टाकळीयेथे दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात मुंडे साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहून झाली. हा मान संस्थेच्या सचिव श्रीमती.काशिबाई नारायणराव घुले यांच्या हस्ते पार पडला.त्यानंतर मुंडे साहेबांच्या कार्याची, विचारांची आणि लोकसेवे तील योगदानाचीउजळणी विविध मनोगतांच्या माध्यमातून करण्यात आली.कु.साक्षी घुले,चि. ओमकार मुंडे,चि.तेजस आंधळे,चि.प्रविण चौरे या विद्यार्थ्यांनी प्रभावी आणि हृदयस्पर्शी मनोगते सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.विद्यार्थ्यांच्या मनोगतांमध्ये मुंडेसाहेबांचे साधेपण,जनसेवा आणि नेतृत्वगुण यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष श्री.शंकर घुले, शाळेचे मुख्याध्यापक श्री. घुले ए.एन.सर,तसेच श्री. श्रीकांत घुले सर यांच्या सह शाळेतील सर्वशिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी मुंडे साहेबांच्या प्रेरणादायी कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या आदर्शातून मार्गदर्शन करण्याचा संदेश दिला.



# महावितरणचे २२८५ कंत्राटी कामगार कायम करा, हायकोर्टाचे आदेश

**उरण | प्रतिनिधी**

महावितरण मधील वीज कंत्राटी कामगारांना कायम करावे या मागणी साठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघाने २०१२ साली मा.मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत ५६५६/२०१२ ही याचिका दाखल केली होती. मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने हे प्रकरण मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे वर्ग करण्यात आले. एकूण २२८५ कामगार यात असून सातत्यपूर्ण १३ वर्षांच्या कायदेशीर लढ्यानंतर १७ जून रोजी मा.न्यायाधीश एस.झेड.सोनभद्रे यांनी ऐतिहासिक अवॉर्ड जाहीर केला होता.सदरील मा.कोर्टाचा अवॉर्ड ( निकाल ) बुधवार दि.१० डिसेंबर रोजी ल.य.भुजबळ, कामगार उपायुक्त महाराष्ट्र शासन (औद्योगिक विवाद) यांनी अधिकृतरीत्या संघटनेला दिला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे, उपसरचिटणीस राहुल बोडके, संघटन सचिव उमेश आणेराव व कोषाध्यक्ष सागर पवार हे कामगार आयुक्त कार्यालय मुंबई येथे उपस्थित होते.

**निकाला मधील महत्त्वपूर्ण मुद्दे:–**

१) महावितरण विभागातील कंत्राटी कामगार हे प्रत्यक्ष व कायम कामगार मानले जातील.
२) कंत्राटदार ही व्यवस्था केवळ नाममात्र/बनावट असल्याचे न्यायालयाने मान्य केले आहे.
३ ) सन २०१२ पासून आतापर्यंतच्या कालावधीत महावितरणच्या कायम कामगारांप्रमाणे वेतन, भत्ते व सर्व तदनुषंगिक लाभ फरकासह देण्याचे आदेश.
४ ) सहा महिन्यांच्या आत अनुषंगिक लाभ न दिल्यास प्रलंबित रकमेवर ५% व्याज देणे बंधनकारक.

# नागपूर-अमरावती विभागातील प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करावीत-सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**दैनिक वादळ वार्ता**
**नागपुर । प्रतिनिधी**

नागपूर व अमरावती विभागातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील सर्व प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्यात यावीत, असे स्पष्ट निर्देश आज नागपूर विधानभवन येथे घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले.महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे,यांच्या अध्यक्षतेखाली पारपडलेल्या बैठकीस आ.अशिष देशमुख, सचिव (रस्ते) श्री. संजय दशपुते, सचिव (बांधकाम) श्री. आबासाहेब नागरगोजे, मुख्य अभियंता (नागपूर) श्री. संभाजी माने, मुख्य अभियंता (अमरावती) श्री. अरुण गाडेगोणे तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.बैठकीत नागपूर येथील आमदार निवासस्थान, रवि भवन येथील इमारती, तसेच विविध प्रशासकीय इमारतींची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला. अमरावती शहरातील राजकमल चौक येथील रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम जलदगतीने पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करण्याचेही निर्देश मंत्री भोसले यांनी दिले. नागपूर आणि अमरावती विभागातील सुरू असलेल्या रस्ते प्रकल्पांचा आढावाही यावेळी घेण्यात आला.प्रलंबित रस्ते प्रकल्पांच्या संदर्भात संबंधित



ठेकेदारांना नियोजित वेळेत व दर्जेदार काम पूर्ण करण्याचे कडक निर्देश देण्यात आले. कामाच्या गुणवत्तेबाबत (क्वालिटी कंट्रोल) कोणतीही तडजोड न करता, गुणवत्ता नियंत्रण विभाग तसेच मुख्य अभियंत्यांनी काटेकोरपणे लक्ष ठेवावे, व कामासंबंधित कोणत्याही तक्रारी येऊ नयेत, असेही मंत्री भोसले यांनी नमूद केले.तसेच राज्यातील सहा विभागांतून इतर राज्यांना जोडणाऱ्या, अंदाजे ३०० ते ६०० किमी लांबीच्या मार्गांचा समावेश असलेल्या जवळपास १५०० किमी राष्ट्रीय महामार्ग प्रस्तावाचे नियोजन व तयार करण्याचे निर्देशही मंत्री भोसले यांनी या वेळी दिले.

## लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांची जयंती शिक्षक कॉलनीत उत्साहात पण साधेपणाने साजरी होणार

**दैनिक वादळ वार्ता**
**प्रकाश मुंडे । बीड**

बहुजन समाजासाठी आणि उपेक्षित वंचितांसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचणारे आणि महाराष्ट्रात असंख्य राजकीय कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण करणारे लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांची जयंती शिक्षक कॉलनी, केज येथे साध्या पद्धतीने पण उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात येणार आहे.

शिक्षक कॉलनी मित्र मंडळ आणि परिसरातील नागरिकांच्या वतीने ही जयंती शुक्रवार, दिनांक १२/१२/२०२५ रोजी ऐश्वर्या संपन्न राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिर, शिक्षक कॉलनी, केज येथे आयोजित करण्यात आली आहे.वंचित आणि बहुजन समाजाच्या उद्धारासाठी मुंडे साहेबांनी केलेल्या कार्याची आठवण ठेवत, त्यांची जयंती उत्साहात परंतु कोणत्याही प्रकारचा अनावश्यक खर्च टाळत, साधेपणाने



साजरी करण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे.उपस्थितीचे आवाहन: या कार्यक्रमाला प्रकाश मुंडे, दत्ता धस पंत, भगवानराव केदार, देसाई घुले साहेब,बाबासाहेब केदार, पिटू भैया तांदळे, खय्युम शेख, रवि घुले, गोटू भैय्या पाळवदे, अमोल धस, प्रा. मुकूंद घुले, अमोल मुंडे, मोहसीन शेख, शशिकांत ढाकणे, अमोल घुले, रणजित घुले, संदीप भुतडा, अमर केजकर,चंदू चौरे, हानूमंत घोळवे,केशव बच्छाव,सोनू वैभव धस, वैभव केंद्रे,अमोल ठोंबरे, प्रदीप ठोंबरे, अतुल ठोंबरे, विकास मुळे, आकाश बोराडे, रवि अंधारे, मनोज मस्के, विजय अंधारे, प्रविण साबळे, रोहीत मुंडे, राजेश गवळी, राजेभाऊ मुळे, अनंत आघाव सर, महादेव जाधवर, विष्णू राख, महेश राख,दत्ता नाईकवाडे, आसद शेख, गणेश ढाकणे, बाळू थोरात भैय्या, नवनाथ घुले, नवनाथ सावंत, योगेश हांगे, रामहरी घुले सर, बापु घुले सर, डॉ डापकर साहेब, बाबा मुंडे सर प्रशांत धस, सोहम अंधारे, विक्की घोडके, काकड सर, अंधारे सर, स्वामी साहेब, गोरक घुले , स्वप्निल घुले ,नागरगोजे साहेब, रमाकांत ढाकणे, डोईफोडे वसंत फौजी, गोविंद घोळवे, वैभव डोईफोडे चिकू चौरे, ओम केदार, औदूंबर ढाकणे, शशिकांत ढाकणे, मयुर टकले, कृष्णा आकुसकर,श्रीकांत चौकीदार , चौरे मामा, पप्पू गायकवाड, गालफाडे तात्या,राजा राऊत, मनोज शिंदे ,आजय मैंद,अलोक गायकवाड, प्रविण थोरात, अर्णव अंधारे , पारस थोरात, राम घुले व इतर सर्व मान्यवर तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षक कॉलनी मित्र मंडळ आणि परिवाराकडून करण्यात आले आहे.

## कृष्णा डायग्नोस्टिक लि.केज उत्कृष्ट आरोग्य सेवेबद्दल एन ए बी एच कडून सन्मानित



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज येथील उपजिल्हा रुग्णालयात कृष्णा डायग्नोस्टिक लि. सिटीस्कॅन सेवा देणाऱ्या या खाजगी कंपनीस रुग्णांना उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल न्यू दिल्ली एन ए बी एच यांच्याकडून सन्मानपत्र प्राप्त झाले. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ दत्तात्रेय केंद्रे, स्त्री रोग तज्ञ डॉ इंगोले,डॉ हनुमंत सौदागर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. मॅनेजर विवेकानंद स्वामी , तंत्रज्ञ अशोक दहिफळे, बाजीराव चाटे,अभिजित थोरात, सिद्धार्थ मुंडे,ज्ञानदेव मुंडे सुषमा सोनवणे यांनी दिलेल्या सेवेबद्दल हे सन्मानपत्र प्राप्त झाले आहेग्रामीण भागातील रुग्णांना चांगली आरोग्य सेवा दिल्याबद्दल हे सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यापुढील कालावधीमध्येही २४ तास सेवा उपलब्ध राहील अशी माहिती कंपनीचे प्रमुख स्वामी विवेकानंद यांनी दिली .

## प्रशासकीय दिरंगाईमुळे ठेकेदाराला ५३ लाखांचा दंड; प्रकाशा-मालदा रस्त्याच्या कामाला अखेर गती

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

गेल्या तीन वर्षांपासून कोट्यवधींचा निधी मंजूर असूनही रखडलेला प्रकाशा ते मालदा रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. या रस्त्यासाठी निधी उपलब्ध झाल्यानंतर प्रशासकीय यंत्रणेने कार्यवाही केली आहे, तसेच कामात झालेल्या मोठ्या दिरंगाईमुळे संबंधित ठेकेदारावर ५३ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.



मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत अंदाजे ८ कोटी रुपये खर्चाच्या या महत्त्वाकांक्षी रस्त्यासाठी निधी मंजूर झाला होता. निधीची उपलब्धता नसल्यामुळे काम थांबले असल्याचा दावा ठेकेदार आणि संबंधित विभागाकडून यापूर्वी करण्यात येत होता.

या संदर्भात, भूषण भामरे (कनिष्ठ अभियंता, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना) यांनी नुकताच खुलासा केला आहे. त्यांनी माहिती दिली की, काही प्रमाणात निधीची उपलब्धता झाली आहे. त्यानुसार, तऱ्हावद ते खरवड रस्त्याच्या कामाला तातडीने खडी टाकून सुरुवात करण्यात आली आहे. कामामध्ये तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधीची दिरंगाई झाल्यामुळे प्रशासनाने या ठेकेदारावर कठोर कारवाई केली आहे. या दिरंगाईसाठी ठेकेदाराला तब्बल ५३ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. या दंडात्मक कारवाईमुळे ठेकेदाराला रस्त्याचे काम गुणवत्तापूर्ण आणि लवकरात लवकर पूर्ण करणे आता बंधनकारक झाले आहे. या कार्यवाहीमुळे, उघडलेल्या रस्त्यावर आता खडी टाकण्याचे काम सुरू झाले आहे. परिसरातील नागरिकांची वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली रस्त्याची मागणी आता पूर्णत्वास जाणार असल्याने जनतेमध्ये समाधानाची भावना आहे. जरी रस्त्याच्या एका टप्प्यातील (तऱ्हावद ते खरवड) काम सुरू झाले असले तरी, उर्वरित रस्त्याच्या कामासाठी निधीची मागणी जोर धरत आहे. बोरद परिसरातील नागरिकांकडून प्रशासनाला आवाहन करण्यात येत आहे की, दंडात्मक कारवाईचे सकारात्मक परिणाम पूर्णत्वास नेण्यासाठी आणि जनतेच्या सोयीसाठी, प्रशासनाने उर्वरित रस्त्याच्या कामात किंचितही विलंब न करता तातडीने निधी उपलब्ध करून संपूर्ण रस्ता लवकरात लवकर पूर्ण करावा.

## धुळे-सुरत महामार्ग रक्तलांच्छित: कोंडाईबारी घाटात भरधाव ट्रकची ट्रॅक्टरला धडक; ऊस वाहतूक करणाऱ्या चालकाचा जागीच मृत्यू

**फरार ट्रक चालकाचा शोध सुरू; अपघातांची वाढती मालिका महामार्गाच्या दुर्दशेवर बोट**

**दैनिक वादळ वार्ता**
**मोहसीन शेख । विसरवाडी**

दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी (गुरुवारी) सकाळी आठ वाजेच्या सुमारास धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्गावरील कोंडाईबारी घाटात दर्गा जवळील उतारावरील गतीरोधकाजवळ एका अत्यंत भीषण अपघातात एका ट्रॅक्टर चालकाचा जागीच मृत्यू झाला.



मिळालेल्या माहितीनुसार, भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रक क्रमांक ऋा १४ द ८६७२ ने पुढे जात असलेल्या ट्रॅक्टरला मागून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की, ट्रॅक्टर चालक संजय कुत्या गावीत (वय ४७, राहणार चितवी) यांचा घटनास्थळावरच मृत्यू झाला.

संजय गावीत हे ऊस कारखान्यात ऊस खाली करून आपल्या गावाकडे परत येत असताना त्यांच्या गावाजवळच काळाने त्यांच्यावर झडप घातली. ही बातमी चितवी गावात पसरताच संपूर्ण गाव सुन्न झाले आहे.

अपघातानंतर संबंधित ट्रक चालक लगेच घटनास्थळावरून पसार झाला आहे. घटनेची माहिती मिळताच विसरवाडी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा केला. फरार ट्रक चालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू असून पुढील तपास जलदगतीने सुरू आहे.

या दुर्घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती, जी नंतर पोलिसांनी सुरळीत केली. मात्र, धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्गावर दररोज अपघातांची मालिका सुरू असल्याने, या रस्त्याच्या दुरवस्थेला जबाबदार कोण? हा प्रश्न आता वाहनचालक आणि प्रवाशांना पडला आहे.

## आदर्श विद्यालय बनसारोळा शाळेचा शैक्षणिक सहलीचा उत्साहपूर्ण यशस्वी समारोप



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

आदर्श विद्यालय बनसारोळा येथे यावर्षी भव्य शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. दिनांक ६ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०२५ यादरम्यान सहल उत्साहात पार पडली.एकूण१२०विद्यार्थी,१२ शिक्षक आणि २ शिक्षकेतर कर्मचारी यांचा सहलीत उत्स्फूर्त सहभाग होता.सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी राज्यातील महत्त्वपूर्ण धार्मिक, ऐतिहासिक आणि भौगोलिक स्थळांना भेट दिली. याततुळापूर, आळंदी, देहू,लोणावळा,पाली, मुरुड.-जंजिरा,अलिबाग बीच,हरिहरेश्वर,रायगड, प्रतापगड आणि महाबळेश्वर याठिकाणांचा समावेश होता.याभेटींमुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान,निरीक्षण शक्ती आणि इतिहास -भूगोला विषयीची समज अधिक दृढ झाली.या संपूर्ण सहलीचे नेतृत्व साळुंके सर यांनी उत्कृष्टपणे केले.त्यांना प्रमोद मोरे,संतोष रोकडे, शिवाजी मांदळे,सुरज लोखंडे,जगन्नाथ काळे, मोरे मॅडम,येडले मॅडम, सरवदे मॅडम,यादव मॅडम, नरके मॅडम तसेच बाळासाहेब काकडे आणि गिरीधर जोगी यांचेमोलाचे सहकार्य लाभले.सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांची सुरक्षितता,शिस्त आणि मार्गदर्शन यांची उत्तम प्रकारे काळजी घेतली. सहलभर विद्यार्थ्यांनी समूहचर्चा,निरीक्षण, गीत-संगीत तसेच शैक्षणिक उपक्रमांचा भरपूर आनंद घेतला. भोजन व राहण्याची व्यवस्था उत्तम असल्याने सहलीचा आनंद अधिक वाढला.या यशस्वी सहलीस संस्थेचे अध्यक्ष अशोकराव काकडे,सचिव बालासाहेब काकडे आणि विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिंधुताई चव्हाण यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. व्यवस्थापनाच्या पाठबळा मुळे संपूर्ण सहल उत्कृष्टरीत्या पार पडली. शैक्षणिक,सांस्कृतिक आणि ऐतिहासिक माहितीने समृद्ध अशी ही सहल विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरली.

## शेतकरी ग्राहकानी १५ डिसेंबर पर्यंत रब्बी पिक विमा काढावा-अनिल बोर्डे

**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

जिल्ह्यात रब्बी हंगामात सुधारित पंतप्रधान पिक विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी भारतीय कृषी विमा कंपनीची निवड करण्यात आली आहे. वातावरणातील अनियमितता ,कीड रोग आणि इतर नैसर्गिक कारणामुळे होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना या योजनेतून संरक्षण मिळणार आहे. त्याकरिता शेतकऱ्यांना १५ डिसेंबर ची मुद्दत देण्यात आली आहे.

तरी जिल्ह्यात शेतकऱ्यांना यंदाच्या सन २०२५-२६ रब्बी हंगामातील पिक विमा योजनेत गहू बागायत हरभरा रब्बी कांदा या तीन पिकासाठी अधिसूचित पिकासाठी अधिसूचित महसूल मंडळ क्षेत्रात अधिसूचित पिकासाठी विमा क्षेत्र घटक धरून सहभाग घेता येईल. सदर योजनेत सहभाग कर्जदार व बिगर कर्जदारांना ऐच्छिक असुन योजनेत सहभागी होण्याची गहू बागायत हरभरा कांदा रब्बी या योजनेत सहभागी होण्यासाठी १५ डिसेंबर२५ पर्यंत देण्यात आली आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी ग्री - ट्रॅक नोंदणी फार्मर आयडी, खाते क्रमांक, सातबारा आठअ आदी कागदपत्रे व ई पीक पाहणी करणे आवश्यक आहे आदी समस्या साठी कृषी कार्यालयास संपर्क करावा जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी ग्राहकाने रब्बी पिक विमा योजना चा लाभ घ्यावा असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक महाराष्ट्र पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले आहे.



## गप्पेवाडी-नामेवाडी येथे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची जयंती अनोख्या उपक्रमाने साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील गप्पेवाडी-नामेवाडी ग्रामपंचायतचे सरपंच बाळासाहेब केदार यांच्या पुढाकारातून लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची जयंती गावातील हनुमान मंदिर येथील सभागृहात ऊस तोड कामगारांच्या गरजू मुलांसाठी शालेय गणवेश व टिफिन बॅग तसेच खाऊ वाटप करून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे शालेय विद्यार्थ्यांनी याकार्यक्रमात स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जीवन कार्यावर आधारित उत्कृष्ट भाषणे केले.मुंडे



साहेबांचे विचार हे समाजातील नव्या पिढीपर्यंत आपण अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून पोहोचविले पाहिजेत,असे मत सरपंच बाळासाहेब केदार यांनी बोलताना व्यक्त केले.या कार्यक्रमाला जि.प.प्रा. शाळा नामेवाडी, गप्पेवाडी,पिंपळशेतवस्ती, महादेव वस्ती या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते. तसेच गप्पेवाडी व नामेवाडी पंचक्रोशीतील सरपंच बाळासाहेब केदार ,पांडुरंग केदार,दिनकर केदार,चंद्रकांत केदार,हरि केदार,बालू फौजी,विष्णु केदार,अशोक केदार, सत्यप्रेम केदार,दत्ता केदार,बाबा केदार, रामहरी केदार,कृष्णा केदार,बाबुराव पाटील, चांगदेव केदार,बीभिशन केदार,नामदेव केदार, अशोक सुधाकर केदार, श्रीहरी केदार,रघुनाथ केदार,राहुल केदार,अंकुश केदार,दगडू केदार,यांच्या सह शेकडो आबाल वृद्ध उपस्थित होते.या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल,आणि हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी गावातील तरुणांनी सहकार्य केल्याबद्दल सरपंच बाळासाहेब केदार यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# तळोदा पोलिसांची धडाकेबाज कारवाई! एकाच वेळी चार अवैध ताडी गुत्त्यांवर छापा; पाच जण ताब्यात

## गुन्हे दाखल, संशईतांना दोन दिवसांची पोलीस कोठडी

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा शहर हद्दीत मानवी आरोग्यास हानिकारक विषारी रसायनयुक्त ताडीची विक्री करणाऱ्या अवैध धंद्यांविरोधात तळोदा पोलिसांनी (दि. १२) रोजी एकाच वेळी चार ठिकाणी धडक कारवाई केली. पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही मोठी कारवाई करण्यात आली. या छाप्यात दोन महिलांसह पाच परप्रांतीय संशईतांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्यावर गुन्हा नोंद करून त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे.

शहरातील अक्कलकुवा रोड, प्रधान हाट्टीमधील शेड, नवीन नगरपालिकेच्या मागे आणि कॉलेज बायपास रोड अशा चार वेगवेगळ्या ठिकाणी पोलिसांच्या पथकांनी एकाच वेळी छापा टाकला.

या कारवाईदरम्यान प्रत्येक ठिकाणाहून ४० ते ५० लीटर मानवी आरोग्यास अपायकारक, घातक रसायन मिश्रित ताडी जप्त करण्यात आली. पोलिसांनी दोन पंचांच्या समक्ष जागेवर पंचनामा करून मुद्देमालासह आरोपींना ताब्यात घेतले.अवैध ताडी विक्री करून धंदा करणारे नरसिंहा लिंगया वेंगली (वय ५२), कलकणार नरसिंहा वेंगली (वय ५०), जगदीश कपूर पटेल (वय ३२) आणि दोन महिला (सर्व रा. तळोदा) यांना ताब्यात घेण्यात आले.

या संशईतांविरोधात तळोदा पोलीस ठाण्यात चार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**लागू करण्यात आलेली कलमे:**

भा. न्या. सं. : कलम १२३, २७५

दारूबंदी अधिनियम: कलम ६५(ई)

सर्व आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना पुढील तपासासाठी दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



# समाजसेवक नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त कानेश्वर विद्यालयात शैक्षणिक साहित्य वितरण

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

साबला येथील रहिवासी तसेच कानेश्वर विद्यालय, कानडीमाळी येथील सहशिक्षक असलेले समाजसेवक नरहरी काकडे यांनी आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा करत आदर्श निर्माण केला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त कानेश्वर विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. शिक्षणास प्रोत्साहन देण्याच्या हेतूने काकडे यांनी घेतलेली ही पुढाकार सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.



कार्यक्रमास मुख्याध्यापक संतोष गरडे, सहशिक्षक अनंत गवळी, सचिन खाडे, अरुण गिते, लिपिक सिद्धार्थ राऊत, आत्माराम राऊत, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ, गणेश कटारे, राहुल मुळे आणि लखन राऊत यांची उपस्थिती होती. नरहरी काकडे यांच्या या सामाजिक कार्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून समाजाभिमुख वाढदिवस साजरा करण्याचा हा उपक्रम आदर्शवत असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

# लहुरी उरूस मध्ये रंगला कुस्तीचा फड

दैनिक वादळ वार्ता

**शेख नसीर । प्रतिनिधी**

सर्व धर्मांमधील एकतेचे प्रतीक आहे.दर्गाहा हजरत हसन पीर साहब उरूस दरवर्षी .प्रमाणे या ही वर्षी उरूस निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेने यात्रोत्सवाचा थाटात समारोप झाला. या स्पर्धेत कुस्ती दंगलीची परपंरा यात्रौवाच्या होणाजया कुस्त्यांची दंगलीला जुनी परंपरा आहे.येथील कुस्ती स्पर्धेत काही मल्लांनी चपळता व सुरेख डावपेच दाखवित प्रेक्षकांचे डोळ्यांचे पारणे फिटले होतेकुस्त्यांचे आयोजन. केले.दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यात्रेनिमित्त दर्गाहा परिसरात रहाट पाळणे, खेळणी, मिठाई, स्टेशनरीची दुकाने, केळी व पेरूच्या व्यापाऱ्यांनी दुकाने थाटली होती. यात्रेसाठी बाल-गोपाळांसह महिला, ग्रामस्थांनी गर्दी केली होती.यात्रा चे कार्यक्रम पार पाड ण्यात सहकार्य करणारे गावचे सरपंच चाळक पंडित वसंतराव. उप सरपंच विजय चाळक विलास आप्पा जोगदंड दत्तात्रय चाळक दर्गाहा चीं सेवा करणारे मुजावर शेख मुक्तार भाई. ग्रा.सदस्य सय्यद महेबूब चाळक बाळासाहेबशेख नबी सर. गावचे चेरमन वाहेद शेख शयमुद सर.रंजित चाळक कृष्णा जगताप.भीमा चाळक .शेख मेनोदिन.शेख आयनोदीन. शेख मुस्तफा.खेरूदिन.भाई .नसीर बाबा पत्रकार सर्व पदाधिकारी उपस्थित होते...



# सांची बुद्ध विहार येथे सुर्य पुत्रास जयंती दिनी अभिवादन



दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतिन भारतीय बौद्ध महासभेचे दुसरे राष्ट्रीय अध्यक्ष,चैत्यभूमीचे शिल्पकार ,सुर्यपुत्र यशवंत उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या ११३ व्या जयंती दिनी सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेच्या महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे या होत्या तर या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभचे जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, जिल्हा संघटक बी सी डोंगरे, माजी जिल्हा उपाध्यक्ष गुलाब प्रधान,तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे,शिवाजी मोरे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुका कोषाध्यक्ष डी एस साळवे ,तालुका संस्कार उपाध्यक्ष गुलाबराव धाईजे,कलावतीताई मोरे, भगवान डोंगरे, मोहन काकडे, संभाजी धाईजे हे उपस्तीत होते तसेच या कार्यक्रमाच सुत्रसंचलन महिला तालुका सरचिटणीस कोमलताई डोंगरे,यांनी केले तर आभार महिला तालुका कोषाध्यक्षा अनुराधा ताई साळवे यांनी मानले

# दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त ४२ रक्तदात्यांनी केले रक्तदान

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज आयोजित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त दि. १२ डिसेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी एकूण ४२ रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्तदान चळवळीवरील आपले प्रेम व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळ या संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय केज श्रीकृष्ण नागरगोजे उपस्थित होते. इतर मान्यवर उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, मा. वि. चे मु. अ. शिवनंदा मुळे, प्रा. वि. चे मु. अ. वसंत शितोळे, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मु. अ. गणेश कोकीळ, प्राचार्य शंकर भैरट, सेवानिवृत्त शिक्षक हनुमंत घाडगे आदी उपस्थित होते.



सदरील रक्तदान शिबिर हे मागील ३० वर्षापासून या शाळेमध्ये आयोजित केले जाते. यावर्षी सदरील शिबिराने ३१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मागील ७ वर्षापासून हे शासकीय शिबिर सुरू आहे. या शिबिराचा सर्वसामान्य याचकाला उपयोग होतो. रक्तदानाबद्दल रक्तदात्यामध्ये बरेच गैरसमज असतात परंतु रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, वयाच्या १८ ते ५५ वर्षापर्यंत आपण रक्तदान करू शकतो, रक्तदान केल्याने बरेच आजार कमी होतात, रोगप्रतिकारशक्ती वाढते, वजन कमी होते तसेच ७२ तासांमध्ये दिलेले रक्त पुन्हा परत येते. दर ६ महिन्याला रक्तदान केले पाहिजे जेणेकरून याचकाचे प्राण वाचतील. याप्रसंगी माजी विद्यार्थी डॉ. अशोक डोईफोडे, सहशिक्षक महादेव गिरी तसेच कैलास अंधारे हे या शिबिराचे पहिले रक्तदाते ठरले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. श्रीकृष्ण नागरगोजे, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी उपजिल्हा रुग्णालय केज व जिल्हा रुग्णालय बीड तसेच सतीश गायकवाड लॅब असिस्टंट, विनोद रावताडे लॅब टेक्निशियन तर युवराज बाबरे, हेमंत बेलदार, वैभव टाकळे यांनी ब्रदर्स म्हणून विशेष परिश्रम घेतले.

तसेच या कार्यक्रमाचे औचित्य साधून युवा मास्टर स्ट्रोक कॉम्पिटिशन च्या वतीने घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा परीक्षेमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले. यामध्ये- सातवी ते दहावी गटातून कु. वेदिका सिद्धेश्वर घुले ७ वी, अनुष्का बाळासाहेब अहंकारे ७ वी, यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वरील यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतील चित्रकला शिक्षक दादासाहेब गायकवाड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी मानले.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय



दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

टेनिसव्हॉलीबॉल महाराष्ट्र असोसिएशन यांच्यावतीने अक्कलकोट येथे घेण्यात आलेल्या २७ व्या मिनी व युथ राज्यस्तरीय टेनिसव्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा टेनिसव्हॉलीबॉल चा संघ युथ गटामधून राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये द्वितीय आला आहे,

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संघामध्ये कर्णधार वैष्णवी कोरडे, अदिबा शेख, आसावरी शिंदे, आरती जाधव, प्रियंका जाधव, गौरी गायकवाड या विद्यार्थिनींचा समावेश होता. या खेळाडूंचा पहिला सामना अहमदनगर जिल्हा सोबत होऊन सरळ दोन सेट मध्ये विजय मिळवला, दुसरा सामना लातूर जिल्ह्याशी झाला , लातूरच्या संघास सहज पराभूत करून, फायनल चा अंतिम सामना सांगली विरुद्ध बीड असा झाला, अंतिम सामन्यांमध्ये अटीतटीच्या लढतीमध्ये रौप्य पदक प्राप्त केले. या संघामधील उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्यामुळे, २४ ते २७ डिसेंबर झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी वैष्णवी कोरडे, अदिबा शेख, यांची निवड झाली आहे, सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या या दोन खेळाडू झारखंड येथे महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.विजेत्या खेळाडूंना प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ऍड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे, प्रा. टाक सर. प्रबंधक प्रशांत चव्हाण, प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा.आय. एस. पठाण, एकनाथ मस्के,बनसोडे सर, गोकुळ शिंदे,बेदरेआदींनी अभिनंदन केले

# प्रभागनिहाय एकाच टेबलवर मतमोजणी करण्याची दीपक देशमुख यांची निवडणूक विभागाकडे मागणी

**वेगवेगळ्या टेबलांवर मतदान मोजणी केल्याने प्रतिनिधींची संख्या वाढते आणि गडबड होण्याची शक्यता**

**प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र टेबल आणि एकाच वेळी मतमोजणी केल्यास प्रक्रियेची पारदर्शकता टिकून राहील**

**सर्व उमेदवारांच्या उपस्थितीत स्ट्राँग रूमचे सील आणि कुलूप उघडण्याची प्रक्रिया पार पाडावी**

दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

परळी नगर परिषद निवडणूक २०२५च्या पारदर्शकतेसाठी प्रभागनिहाय एकाच टेबलवर मतमोजणी करण्याची मागणी प्रभाग क्रमांक ६ चे उमेदवार दीपक रंगनाथ देशमुख यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी अर्जाद्वारे केली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून मतमोजणीसाठी नमुना ९(२) भरून देण्याच्या सूचना मिळाल्या असून, मतदान केंद्रांच्या संख्येनुसार प्रतिनिधी नेमणूक करावी, असे सांगण्यात आले आहे. मात्र निवडणूक विभागाने १२ टेबलांची व्यवस्था केली असून फेऱ्यांनुसार मतमोजणी होणार असल्याची माहिती देशमुख यांनी दिली.त्यांनी अर्जात नमूद केले की, वेगवेगळ्या टेबलांवर मतदान केंद्रांची मोजणी केल्याने प्रतिनिधींची संख्या वाढते आणि गडबड किंवा गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असते. २०१६ मध्ये जशी प्रभागाची मतमोजणी एका टेबलवर झाली, तशीच याही वेळी व्हावी.देशमुख यांनी दावा केला की, निवडणूक विभागाकडे एकूण १७ टेबल तयार केल्याची माहिती मिळत असून, प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र टेबल आणि एकाच वेळी मतमोजणी केल्यास प्रक्रियेची पारदर्शकता टिकून राहील.याचबरोबर, सर्व उमेदवारांच्या उपस्थितीत स्ट्राँग रूमचे सील आणि कुलूप उघडण्याची प्रक्रिया पार पाडावी, अशीही त्यांनी विनंती केली आहे, जेणेकरून कुठलाही आक्षेप किंवा शंका निर्माण होऊ नये.ही प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसह राज्य निवडणूक आयोग, मुंबई आणि जिल्हाधिकारी, बीड यांनाही पाठविण्यात आली आहे.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077